कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
20 Sep 2026 - Page 3

# हुसेन कासम दाणेकरी अँग्लो उर्दू हायस्कूलमध्ये सायबर जनजागृती

## सुरक्षित इंटरनेट वापर, ऑनलाइन फसवणूक आणि डिजिटल माहितीच्या संरक्षणाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



कराड : कराड मुस्लिम एज्युकेशन सोसायटी संचालित हुसेन कासम दाणेकरी अँग्लो उर्दू हायस्कूल अँड बी.आय. एस. ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे विद्यार्थ्यांसाठी 'सायबर जनजागृती' विशेष सत्र उत्साहात पार पडले. डिजिटल युगात इंटरनेटचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांना सायबर धोके, ऑनलाइन फसवणूक आणि डिजिटल माहितीच्या सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील विद्यार्थी शिवम कुंभार व यशराज बडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. 'माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलिटी' अर्थात 'माझी माहिती, माझी जबाबदारी' या संकल्पनेभोवती सत्रातील मार्गदर्शन केंद्रित होते. फिशिंग, अज्ञात संकेतस्थळे व लिंक्सचे धोके, सामाजिक माध्यमांवरील खाते हॅकिंग तसेच वैयक्तिक माहितीची चोरी यांसारख्या सायबर गुन्ह्यांचे प्रकार उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आले.

सुरक्षित डिजिटल व्यवहारांसाठी भक्कम संकेतशब्द कसा तयार करावा, सामाजिक माध्यमांवरील गोपनीयता-ि कशा हाताळाव्यात, अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संवाद साधताना कोणती खबरदारी घ्यावी, याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या विविध शंकांचे वक्त्यांनी सोप्या भाषेत निरसन केले. मुख्याध्यापक आर. एम. इरकल यांनी उपक्रमाचे कौतुक केले. इंटरनेट हे शिक्षणासाठी महत्त्वाचे माध्यम असले तरी त्याचा वापर करताना सुरक्षितता आणि जबाबदारीला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अशा जनजागृती उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता आणि सुरक्षिततेची जाणीव वाढण्यास मदत होते, असेही त्यांनी नमूद केले.

उपक्रमासाठी शिक्षक एस. ए. मोमीन, पी. एच. जहागीरदार, एन. ए. जहागीरदार, जे. ए. बोरगावकर, एम. आर. शेख, एस. एम. शेख, एस. एम. कुर्णे व डब्ल्यू. एम. पटेल यांचे सहकार्य लाभले. कर्मचारी ए. एम. भालदार, आर. यू. मुल्ला व एम. एस. मोमीन यांनी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. सत्रास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील 'सायबर शक्ती क्लब'च्या वतीने कराड परिसरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये सायबर जनजागृती कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांसह नागरिकांमध्ये वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांच्या सवयी रुजविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ व 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमाच्या समन्वयक डॉ. प्रियांका शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. क्विक हील फाउंडेशनच्या सौ. अनुपमा काटकर, श्री. अजय शिर्के, श्री. दिपू सिंग व सौ. गायत्री केसकर यांचे सहकार्य लाभत आहे.